प्र.४०७

प्रेसनोट

पुणे शहर, दिनांक २८/०८.२०१९.

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ४०२२/२०१९.

विषय :- गणपती प्रतिस्थापणा व मुर्ती खरेदीनिमित्त करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था-

दिनाक ०१/०९/२०१९ व ०२/०९/२०१९ रोजी श्री. गणेशाची प्रतिस्थापना निमित्त गणेश भक्त व मंडळे सकाळी ०६.०० ते २४.०० वा.पर्यंत श्रीची मुर्ती खरेदी करीत असतात. चालू वर्षी गणेश मुर्ती विक्रीचे बहुसंख्य स्टॉल हे डेंगळे पुल ते शिवाजी पुलाचे दरम्यान श्रमिक भवन समोर (आण्णाभाऊ साठे चौक) व कसबापेठ पोलीस चौकी ते जिजामाता चौक ते मंडई पर्यत दोन्ही बाजूस असलेने या परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे.त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह , विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकते नुसार दिनाक ०१/०९/२०१९ व ०२/०९/२०१९ रोजी सकाळी ०६.०० ते रात्री २४.०० वाजे पर्यत वाहतुकीचे बदला बाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केले आहेत.

---

अ) वाहतूक व्यवस्था :-

१) शिवाजी रोड :- गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे. वाहन चालकांनी खालील मार्गाचा अवलंब करावा.

पर्यायी मार्ग :- गाडगीळ पुतळा चौकातून डावीकडे वळण घेऊन

१. सताजी घोरपडे पथावरुन कुंभारवेस चौक, शाहीर अमर शेख चौक मार्गे इच्छितस्थळी जावे.
२. शिवाजीनगर कडून शिवाजी रोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी स.गो.बर्वे चौकातून डावीकडे, वळून न घेता, सरळ जगजी महाराज रोडने खडोजीबाबा चौक, टिळक चौक मार्गे टिळक रोडने जावे.
३. झाशीची राणी चौक ते खुडे चौक ते डेंगळेपुल मार्गे कुंभारवेसकडे जाणा-या वाहन चालकांनी खुडे चौकामधून म.न.पा.पुणे समोरुन प्रिमीयर गॅरेज चौक शिवाजीपुल मार्गे गाडगीळ पुतळा चौक डावीकडे वळन घेऊन कुंभारवेस चौक या मार्गाचा वापर करावा.

२) सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड)
गणपती विक्री दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूकडील वाहतूक सुरु राहील, परंतू नमुद टप्प्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाहने पार्क होऊ करु नये.

❖ आवश्यकतेप्रमाणे बॅरिकेडस् व दोरचा वापर करण्यात येईल.

पार्किंग व्यवस्था :-

१. मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा पर्यंत.
२. जमनालाल बजाज पुतळा ते पुरम चौक रस्त्याचे डाव्या बाजूस
३. निलायम ब्रिज ते सिंहगड रोड जंक्शन

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

**ब) वाहतूक सुरु असलेले रस्ते :-**

खालील नमुद मार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनाकरीता (जड वाहनांना प्रवेश बंदी) एकेरी वाहतूक सुरु राहील

१. फडके हौद चौक ते जिजामाता चौक ते फुटका बुरुज
२. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक ते मोती चौक
३. सोन्या मारुती चौक ते बेलबाग चौक ते सेवासदन चौक
४. मंगला टॉकिज समोरील प्रिमीयर गॅरेज लेन मधून शिवाजीरोड ते गाडगीळ चौक

---

**क) पार्किंग व्यवस्था :-**

गणेश मुर्ती खरेदीसाठी येणारे भक्त/मंडळाची वाहने पार्किंगसाठी खालील प्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

१. न्या.रानडे पथावर कामगार पुतळा चौक ते शिवाजी पुतळा या दरम्यान रस्त्याचे कोर्टाकडील एका बाजूस.
२. वीर संताजी घोरपडे पथावर म.न.पा. बिलभरणा केंद्र ते गाडगीळ पुतळा चौक या रस्त्याचे दोन्ही बाजूस
३. टिळक पुल ते भिडे पुल दरम्यानचे नदीपात्रातील रस्त्यावर
४. मंडई येथील मिनर्व्हा व आर्यन पार्किंग तळावर
५. शाहू चौक (फडगेट चौकी चौक) ते राष्ट्रभुषण चौक :- फक्त रस्त्याचे डावे बाजुस

---

**ड) पी.एम.पी.एम.एल. बसेसच्या डायव्हर्शनबाबत :-**

१. शिवाजीनगर स्टॅण्डवरुन शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस ह्या स.गो.बर्वे चौकातून शिवाजीपुलावरुन जाण्याऐवजी स.गो.बर्वे चौकामधून जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळक रोडने स्वारगेटकडे जातील.
२. कार्पोरेशन बसस्टॉप येथून स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस ह्या झाशीराणी चौक मार्गे जंगली महाराजरोडने स्वारगेटकडे जातील.

---

तरी वरील प्रमाणे वाहतूक व्यवस्थेतील बदल अमलात आणून वाहतूक पोलीसाना सहकार्य करावे. हि विनंती.

२१.०८.१९

( पंकज देशमुख )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर.

प्रत :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३,४,५ वाहतुक शाखा पुणे शहर
3.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत सादर,
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/५०२६/२०१९.  पुणे शहर. दिनांक- २८/०८.२०१९

विषय - अथर्वशीर्ष पठणानिमित्त वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलाबाबत...

दिनांक- ०३/०९/२०१९ रोजी पहाटे ०५.०० वाजेपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या समोर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गपणती मंडळ याच्या संयोजनाखाली अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम होत आहे त्या कार्यक्रमासाठी हजारो महिला भाविक सहभागी होत असतात त्याकरीता सदर कार्यक्रम दरम्यान वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी व वाहतूक सुरळीत सुरळीतपणे चालने इष्ट आहे.त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०११९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२.दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५.११६(१) (ए) (बी).११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी. पंकज देशमुख.पोलीस उप आयुक्त.वाहतुक शाखा पुणे शहर. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड.पोलीस वाहने.रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनाक- ०३/०९/२०१९ रोजी पहाटे ०५.०० वाजे पासून ते अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपेपर्यंत वाहतुकीचे बदला बाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

अ) वाहतूक व्यवस्था :-

- खालील नमूद रस्त्यांवर सर्व प्रकारची वाहने जाणे-येणेसाठी बंद करणेत येत आहे.

  १. शिवाजी रोड जिजामाता चौक ते रामेश्वर मंदिर चौक.
  पर्यायी मार्ग- गाडगीळ पुतळा-जिजामाताचौक डावीकडे वळून गणेश रोडने फडके हौदचौक.देवजीबाबा चौक उजवीकडे वळून हनजेखान चौक सरळ महाराणाप्रताप मार्गावरुन गोविंद हलवाई चौक उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक डवीकडे वळून शिवाजीरोडने स्वारगेटकडे

  २. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक
  पर्यायी मार्ग- अप्पा बळवत चौक डावीकडे वळून बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळा चौक उजवीकडे वळून जिजामाता चौक नंतर वरीलप्रमाणे.

- तसेच लक्ष्मीरोडवर विजय मारुती चौक / सोन्या मारुती चौकापासून आवश्यकतेनुसार वाहतूक वळविली जाईल.
  पर्यायी मार्ग- विजय मारुती चौक- शुक्रवारपेठ पोलीस चौकी चौक-नेहरु चौक- श्रीनाथ टॉकीज--रामेश्वर चौक इच्छितस्थळी.

तरी नागरिकांनी वरील प्रमाणे वाहतूक व्यवस्थेतील वदल अंमलात आणून वाहतूक पोलीसाना सहकार्य करावे. ही विनती.

28.08.19

( पंकज देशमुख )
पोलीस उप-आयुक्त.वाहतूक.
पुणे शहर.

प्रत :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१.स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त.परिमंडळ-१.२.३.४.५ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी.वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत सादर.
पोलीस उप आयुक्त. विशेष शाखा-१ पुणे शहर

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/७०२४ /२०१९.

पुणे शहर, दिनांक -२८/०८/२०१९.

विषय :- गणेशोत्सव २०१९ निमित्त शिवाजीचौक,केशवनगर पुणे येथे एकेरी वाहतुक व्यवस्था करण्यात आले बाबत.

गणेशोत्सव २०१९ मध्ये,शिवाजीचौक,केशवनगर या ठिकाणी मांजरी गावाकडून तसेच गायरान वस्तीकडून येणारे रोड एकत्र येतात दोन्ही रोड अरुंद असुन रस्त्याच्या कडेला असलेल्या आस्थापना व वाढलेली लोकवस्ती यामुळे तसेच आगामी गणेशोत्सवात केशवनगर परिसरात परिसरात बरेच सार्वजनिक गणेश मंडळे गणेशोत्सव साजरा करणार असल्याने त्या परीसरातील वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी. पंकज देशमुख,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकते नुसार दिनांक ०१/०९/२०१९ ते १३/०९/२०१९ रोजी विसर्जन मिरवणूका सपे पर्यत तात्पुरत्या स्वरुपाचे खालीलप्रमाणे एकेरी वाहतुकीचे आदेश निर्गमित केले आहेत.

एकेरी मार्ग- १. मुंढवा चौकाकडून शिवाजी चौक,केशवनगर येथे आल्यानतर वाहनचालकांनी मांजरी रोड न जाता पुढे रेणुका माता मंदीराकडून वळून मांजरी रोडला जाणे.

२. गायरान वस्ती कडून मुंढवा चौकाकडे येणा-या वाहनचालकांनी रेणूकामाता मंदीर येथून डावीकडे वळून पुढे व्यंकटेश ग्राफिक्स येथून मुंढवा चौकाकडे जाणे.

तरी वरील प्रमाणे वाहतूक व्यवस्थेतील बदल अमलात आणून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे, हि विनंती.

२८.०८.१९

( पंकज देशमुख )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर.

प्रत :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३,४,५ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत सादर,
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner